जून 2016 | ₹40 | पृष्ठ संख्या 40 | पुणे, वर्ष 6 | अंक 06

आर्थिक साक्षरता +
पारदर्शकता =
स्वाभिमानी भारत

# अर्थपूर्ण



संपादक
यमाजी मालकर

सहसंपादक
सम्राट शिरवळकर

व्यवस्थापक
अशोक तुळपुळे

संपर्क : editor.arthapurna@gmail.com, 9860580147

**'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.**
11, 'हर्षदा', रामबाग कॉलनी,
पौड रोड, पुणे 411038
**फोन :** 020-25430540,
www.arthapurna.org

# अर्थपूर्ण

जून 2016

वर्ष सहावे
अंक सहावा

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्, पुणे.
9881098010

**व्यवस्थापन साहाय्य**
महेंद्र बनसोडे

**वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी**
व्यवहारासाठी संपर्क
020-25430540
9921926538
arthapurna.monthly@gmail.com

**जाहिरात संपर्क**
अर्चना जोशी
9552591874



'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. 31, 34 पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-702, साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे 411038 (सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले.
संपादक : यमाजी मालकर


# अनुक्रमणिका


06 **जे जे हवे, ते सर्व देणारा बँक व्यवहार कर ...यमाजी मालकर**

08 India has an income-tax problem:
Barely anybody pays any....By RAYMOND ZHONG

9 **करभान**

14 **'कर': नको असलेली 'सक्तीची वर्गणी'...! ...डॉ. उमेश घोडेस्वार**

18 **'होम ब्रांच' आणि 'नॉन होम ब्रांच' असा भेदभाव का?...विजय गोखले**

20 **अर्थभान**

24 **आकडे बोलतात**

26 Lets 'Score' from the lesson ...प्रसाद भागवत

28 **कालचा अनुभव उद्याची जमा...प्रशांत बने**

32 **मंगळूरचे 'अर्थक्रांती एकता शक्ती संमेलन'**

34 **वेळ आणि पैसा वाढविणारे दोन बदल ! ...भारतीय**

36 **आधुनिक जीवनशैलीत पैसा प्रेरक की मारक ...कॉमनमॅन**

38 **व्यासपीठ**

भूमिका



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

# जे जे हवे, ते सर्व देणारा बँक व्यवहार कर

**करपद्धतीतील गैरव्यवहार थांबले पाहिजेत, करवसुलीचा पाया वाढला पाहिजे, कर आकारणी सोपी आणि सुटसुटीत झाली पाहिजे आणि सरकारच्या तिजोरीत अधिक महसूल जमा होऊन भारतीयांचे सार्वजनिक आयुष्यही दर्जेदार झाले पाहिजे, हे सर्व एका बदलामुळे शक्य होते, त्याचे नाव अर्थक्रांतीने प्रस्तावित केलेला आणि 32 करांची जागा घेणारा एकच कर म्हणजे बँक व्यवहार कर. इन्कमटॅक्स विभागाने करांविषयीची जी आकडेवारी प्रसिद्ध केली आहे, तीही असेच काही आमुलाग्र बदलले पाहिजे,हेच सांगते.**

सरकारला मायबाप म्हणण्याची प्रथा का पडली, हे समजून घेतले की सरकार आर्थिकदृष्ट्या सक्षम का असले पाहिजे, हे वेगळे सांगण्याची गरज पडत नाही. पण आपल्यातीलच काही महाभाग सरकारला पहिल्या दिवसांपासून शत्रू करून बदनाम करण्याची मोहीम हाती घेतात आणि गरिबांचा जो खरा आधार आहे, तोही त्यामुळे जातो. सरकार म्हणजे नरेंद्र मोदी, मनमोहन सिंग किंवा विशिष्ट पक्षांचे सरकार, असे मानण्याची प्रथा असली तरी सरकारी व्यवस्था म्हणजे सरकार. राजकीय नेते येतात आणि जातात, पण सरकारी व्यवस्था किंवा प्रशासन कायम राहते. जेथे सरकार आर्थिकदृष्ट्या सक्षम असते, तेथे प्रशासन आणि सार्वजनिक सेवा चांगल्या दर्जाच्या असण्याची शक्यता असते, असा जगाचा अनुभव आहे. त्यामुळेच स्वीडनसारखी युरोपीय राष्ट्रे जीवनमानात खूप पुढे निघून गेली आहेत. त्या देशांत जीडीपीच्या तुलनेत करसंकलनाचे प्रमाण 40 ते 50 टक्के इतके प्रचंड असूनही तेथील नागरिकांना ते जड वाटत नाही. कारण आर्थिकदृष्ट्या सरकारे मजबूत असल्याने ती समाजहिताचे निर्णय ठामपणे घेऊ शकतात. त्यांच्यावर खासगी उद्योजक किंवा अतिश्रीमंत मंडळी दबाव आणू शकत नाहीत.

भारत हा विकसनशील देश आहे आणि आपल्या करसंकलनाचे प्रमाण अत्यंत लाजिरवाणे आहे. आज ते जीडीपीच्या तुलनेत कसेबसे 15 ते 16 टक्क्यांच्या घरात आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, सर्व राज्य सरकारे आणि केंद्र सरकार यांचे एकत्रित करसंकलन सुमारे 20 लाख कोटी रुपये इतके आहे. याचा अर्थ या देशाच्या 131 कोटी जनतेचे सर्व सार्वजनिक खर्च या रकमेत भागवायचे आहेत! ते कदापि शक्य नाही. भ्रष्टाचाराचा मुद्दा घडीभर बाजूला ठेवला तर इतक्या कमी महसुलात एवढा मोठा देश चालला आहे, हा एक चमत्कारच म्हटला पाहिजे. त्यामुळे आपल्या देशातील करसंकलन वाढले पाहिजे, ते सोपे सुटसुटीत असले पाहिजे, यात वाद असण्याचे कारण नाही.

इन्कमटॅक्स विभागाने अलीकडेच आपल्या संकलनाचा 16 वर्षांचा डाटा प्रसिद्ध केला. त्यातून फारच आश्चर्यकारक गोष्टी बाहेर आल्या. आपले सार्वजनिक आयुष्य का सुधारत नाही, यामागे नेमके काय दडले आहे, हेच त्यातून स्पष्ट होते.

इन्कमटॅक्सच्या या आकडेवारीनुसार 2014-15 या वर्षात फक्त 4.87 कोटी नागरिकांनी टॅक्स रिटर्न भरले आहेत. म्हणजे लोकसंख्येच्या चार टक्क्यांपेक्षाही कमी! ही टक्केवारीही अलीकडे वाढलेली आहे. शिवाय रिटर्न भरणारे सर्वच कर भरत असतात, असे नाही. या निकषावर 2012-13ला इन्कमटॅक्स भरणाऱ्यांचे प्रमाण केवळ एक टक्का एवढेच भरते! ही आकडेवारी आपल्याला खूप काही सांगते. सर्वांत महत्वाचे म्हणजे भारतीयांनी परदेशात किती पैसा दडविला आहे, याची चर्चा आपण करतो, खरेतर करचोरीच्या माध्यमातून देशात दडविलेला काळा पैसा कितीतरी अधिक आहे. याचा दुसराही एक अर्थ होतो, तो म्हणजे आर्थिक उदारीकरणानंतर अडीच दशके होऊन गेली तरी करसंकलानाचा पाया विस्तृत करण्यात आपल्याला यश आलेले नाही. पायाभूत सुविधांत देश कमी पडतो आहे, असे अनेक जण म्हणतात, पण त्यासाठीची पूर्वअट करसंकलन वाढले पाहिजे आणि त्यासाठी करपद्धती सोपी झाली पाहिजे, याचा साधा उल्लेखही केला जात नाही! आश्चर्य याचे वाटते की जे समाजवादी किंवा साम्यवादी व्यवस्था पाहिजे, यासाठी वर्षानुवर्षे संघर्ष करताना दिसतात तेही या मुद्द्याला कधी हात घालताना

दिसत नाहीत. त्यांना करांचे महत्व लक्षात आले नाही की त्यांना सरकार आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे नको आहे, हे कळण्यास मार्ग नाही. सर्व काही सरकारने केले पाहिजे, असे ते म्हणतात खरे, पण सरकारची ती क्षमता राहिलेली नाही, याविषयी ते काहीच बोलत नाहीत. महसूल वाढण्याशिवाय दुसरा काही पर्याय असता तर हे समजण्यासारखे आहे, पण दुसरा पर्याय नसताना त्याकडे आपल्यातील अनेकांनी साफ दुर्लक्ष केले आहे, हे दुर्दैवी होय.

सरकारचा महसूल वाढावा, यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा की जनतेने, याचे उत्तर सरकारनेच पुढाकार घेतला पाहिजे, असेच आहे. मात्र करांचे प्रमाण वाढले पाहिजे, असे किमान काही कळणाऱ्या नेत्यांनी तरी म्हटले पाहिजे. सरकारी तिजोरी का भरत नाही आणि सरकार नेहमी करवसुली आणि कर वाढविण्याच्याच मानसिकतेत का असते, याचे एक कारण वेगवेगळी नावे देऊन करवसुली केली जाते. त्याची आता इतकी गुंतागुंत झाली आहे की प्रामाणिकपणे कर भरणाऱ्यांच्या दृष्टीने तो वैताग झाला आहे. कर द्यायला आम्ही तयार आहोत, पण हा छळ थांबवा, एवढेच त्यांचे म्हणणे आहे तर ज्यांना कर बुडवायचा आहे आणि ज्यांना करबुडवेगिरीला प्रोत्साहन देऊन आपले उखळ पांढरे करायचे आहे, त्यांना करांची ही गुंतागुंतच हवी आहे. शक्यतो सामान्य माणसाला त्यातले काही कळू नये, असाच प्रयत्न आत्तापर्यंत होत राहिला आहे. पण लोकशाही राज्यव्यवस्थेमुळे सरकारला सर्वच पातळ्यांवर पारदर्शी होणे क्रमप्राप्त झाले असून त्याला करपद्धतीही अपवाद असण्याचे कारण नाही. पूर्वी राजेराजवाडे आणि सुभेदारांच्या माध्यमातून संपत्तीचे प्रचंड केंद्रीकरण होते आणि आपले पोट भरते, हीच फार मोठी गोष्ट आहे, असे प्रजा मानत होती. पण आधुनिक काळात ही बाब मागे पडली असून संपत्तीच्या केंद्रीकरणाला आता चांगले मानत नाहीत. पण लोकशाहीतही राजेशाहीसारखेच संपत्तीचे केंद्रीकरण होत असेल तर काहीतरी चुकते आहे, हे मान्य केले पाहिजे आणि ते बदलण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

इन्कमटॅक्सच्या आकडेवारीनुसार 10 लाखांपेक्षा अधिक उत्पन्न आहे, असे म्हणणारे आज केवळ 11 लाख नागरिक देशांत आहेत! देशात उच्चमध्यमवर्गीयांची संख्या वेगाने वाढत असूनही हा आकडा पुढे सरकत नाही, हे आश्चर्य आहे. याचा थेट अर्थ असा आहे की करचोरीला काही सीमा राहिलेल्या नाहीत. ती थांबविण्यासाठी अशी व्यवस्था आणली पाहिजे, ज्यात कर चुकविता येत नाहीत पण कर भरण्याचा जाचही कोणाला होत नाही. याचा अर्थ करांचे दर वाढविण्यापेक्षा करांचे जाळे व्यापक करण्याचे आव्हान सरकार समोर आहे. या आकडेवारीनुसार प्रत्यक्ष करांत कंपनी कर किंवा कॉर्पोरेट कर, इन्कमटॅक्स आणि इतर करांचा समावेश आहे. मात्र प्रमुख वाटा कंपनी आणि प्राप्तिकराचाच राहिला आहे. 2001 मध्ये कंपनी आणि प्राप्तिकरातून सरकारी तिजोरीत 68 हजार 305 कोटी रुपये जमा होत होते आणि 2014 - 15 ला सहा लाख 95 हजार 792 कोटी रुपये जमा होतात. 2000 ला त्यात कंपनी कराचा वाटा अधिक होता आणि 2014-15 लाही तो अधिक




आहे. याचा अर्थ शहरांत आणि काही मोजक्या मोठ्या गावांत आर्थिक व्यवहार वाढले आहेत, असे ढळढळीत दिसते खरे, पण तेथे करसंकलन वाढत नाही.

या परिस्थितीत बदल करण्यासाठी करांचे हे फुटके आणि सडके नळ दुरुस्त करण्याचा आटापिटा सरकार करताना दिसते आहे. जीएसटी हा पुढील प्रवास असला तरी तो निव्वळ दुरुस्तीचाच मार्ग आहे, हे काळच सिद्ध करील. खरे म्हणजे करपद्धती सोपी करणे, जास्तीत जास्त नागरिकांकडून कमीतकमी कर घेणे, आपल्याकडून कर घेतला जातो आहे, हे कळणारही नाही, अशा पद्धतीने कर घेणे, करचोरी करताच येणार नाही, अशी पद्धत अवलंबणे आणि एवढे सर्व करूनही सरकारी तिजोरी भरलीच पाहिजे, अशा आदर्श करपद्धतीची आज गरज आहे. अर्थक्रांती नेमका तोच मार्ग सांगते. अधिकाधिक व्यवहार बँकेच्या माध्यमातून होतील, असा प्रयत्न एका बाजूला करत राहणे आणि या व्यवहारात फक्त क्रेडीट खात्यावर दोन टक्के (उदा.) कर आपोआप वर्ग करणे, असे अर्थक्रांतीचे प्रस्ताव सांगतात. यानुसार करवसुली केली गेली तर सध्या जी 32 करांच्या नावाने ही वसुली केली जाते, तिची तर गरज राहणार नाहीच, पण आता कर जमा होतो त्यापेक्षा कितीतरी अधिक कर जमा होईल. करपद्धतीतील गैरव्यवहार थांबले पाहिजेत, करवसुलीचा पाया वाढला पाहिजे, कर आकारणी सोपी आणि सुटसुटीत झाली पाहिजे आणि सरकारच्या तिजोरीत अधिक महसूल जमा होऊन भारतीयांचे सार्वजनिक आयुष्यही दर्जेदार झाले पाहिजे, हे सर्व, या एका बदलामुळे शक्य होते. या बदलासाठी एका आमूलाग्र बदलासाठी मनाची तयारी करावी लागेल, एवढे नक्की. पेशंटला वाचविण्यासाठी ऑपरेशनची गरज आहे, हे जेव्हा स्पष्ट होते, तेव्हा त्या एका ऑपरेशनशिवाय पर्याय नसतो, हे तेवढेच खरे. अर्थक्रांती हे असेच एक अपरिहार्य ऑपरेशन आहे.